पोलीस अधिक्षक कार्यालय, जनसंपर्क विभाग धाराशिव.

"हिप्परगारावववाडी शिवारात अवैध गांजा लागवड करुन संवर्धन करणाऱ्या इसमावर उमरगा पोलीसांची कारवाई."

दिनांक 10/10/2026 रोजी उमरगा पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक, प्रल्हाद सुर्यवंशी यांना गोपनिय माहीती मिळाली की, हिप्परगाराव ता.उमरगा जि.धाराशिव येथे एका इसमाने सर्वे नं 39/2/1 मधील शासकीय गायारानातील स्वता:च्या घरालगत स्वता:च्या आर्थीक फायद्यासाठी विनापरवाना बेकायदेशिर रित्या गांज्याच्या झाडांची लागवड करुन त्याचे संवर्धन व जोपासना करीत आहे, अशी खात्रीलायक माहीती मिळाल्याने याबाबत मा.पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर मॅडम, अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर साहेब व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री प्रशांत संपत्ते उप विभाग उमरगा यांना रेड बाबत माहीती देवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली कारवाई करणे कामी शासकीय पंचासह माहीतीच्या ठिकाणी छापा मारला असता, हिप्परगाराव शिवारात सर्वे नं **39/2/1**मधील शासकीय गायारानातील शेतकरी इसम नामे- विठ्ठल बसप्पा खवडे, रा. हिप्परगारावाडी याने शासकीय गायरानात अवैध गांज्याचे झाडे लावुन त्याचे संवर्धन करीत असताना मिळुन आला. त्याचे शेतातुन एकुण **45,79** किलो ग्रॅम वजनाची ओलसर गांज्याची झाडे एकुण किंमत **22,89,500/- (22** लाख **89** हजार **500** रुपये**)** चा मुदेमाल जप्त करण्यात आला आहे. सदर शेतकरी यांचे विरुध्द उमरगा पोलीस स्टेशन येथे गुरनं **658/2026** कलम **8(क), 20(अ), 20(ब), (II)(C)** एन.डी.पी.एस. कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर मॅडम, अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर साहेब, उपविभागीय पोलीस अधीकारी श्री प्रशांत संपत्ते, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री प्रल्हाद सुर्यवंशी, सपोनि श्रीकांत भराटे, पांडुरंग कन्हेरे, पोलीस उप निरीक्षक जगताप, चैतन्य कोनगुलवार उमरगा पोलीस ठाण्याचे पोलीस अमंलदार यांचे पथकाने केली आहे.

जनसंपर्क विभाग धाराशिव पोलीस

पोलीस अधिक्षक कार्यालय, जनसंपर्क विभाग धाराशिव.

"हिप्परगारावववाडी शिवारात अवैध गांजा लागवड करुन संवर्धन करणाऱ्या इसमावर लोहारा पोलीसांची कारवाई."

दिनांक 10/10/2026 रोजी लोहारा पोलीस स्टेशनचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक, पवार यांना गोपनिय माहीती मिळाली की, हिप्परगारवा ता. लोहारा येथे एका इसमाने स्वता:च्या घरालगत स्वता:च्या आर्थीक फायद्यासाठी विनापरवाना बेकायदेशिर रित्या गांज्याच्या झाडांची लागवड करुन त्याचे संवर्धन व जोपासना करीत आहे, अशी खात्रीलायक माहीती मिळाल्याने याबाबत मा.पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर मॅडम, अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर साहेब व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री प्रशांत संपत्ते उप विभाग उमरगा यांना रेड बाबत माहीती देवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली कारवाई करणे कामी शासकीय पंचासह माहीतीच्या ठिकाणी छापा मारला असता, हिप्परगा रवा शिवारात इसम नामे- सुहास उर्फ दत्ता लिंबराज साळुंके वय 37 वर्शे, रा. वाणेगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव, ह.मु. हिप्परगा राव, ता. लोहारा जि. धाराशिव याने आपल्या राहते घराचे बाजूला अवैध गांज्याचे झाडे लावुन त्याचे संवर्धन करीत असताना मिळुन आला. त्याचे शेतातुन एकुण 77,800 किलो ग्रॅम वजनाची ओलसर गांज्याची झाडे एकुण किंमत 77,800/- (77 हजार 800 रुपये) चा मुदेमाल जप्त करण्यात आला आहे. सदर शेतकरी यांचे विरुध्द लोहारा पोलीस स्टेशन येथे गुरनं 233/2026 कलम 8(ब), 20(अ) एन.डी.पी.एस. कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर मॅडम, अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर साहेब, उपविभागीय पोलीस अधीकारी श्री प्रशांत संपत्ते, यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री पवार, पोउपनि केंद्रे, शिंदे विक्रम काकडे, लोहारा पोलीस ठाण्याचे पोलीस अमंलदार यांचे पथकाने केली आहे.

जनसंपर्क विभाग धाराशिव पोलीस